**नियमीत दिवाणी दावा क्र. ११०/२०१६ मधील निशाणी क्र. २९ वरील आदेश.**

सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ अन्वये मयत वादी क्र. १० सुंदराबाई उर्फ सरीबाई रामू गांगुर्डे यांच्या वारसांची नांवे दाव्यात समाविष्ट करण्याकरीता परवानगी मिळणेबाबत दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जदार/वादीचे कथन असे की, सदर दाव्यातील वादी क्र. १० सुंदराबाई उर्फ सरीबाई रामू गांगुर्डे हे दिनांक १३/११/२०१८ रोजी मयत झाले आहे. सबब, वरील मयत वादी यांच्या वारसांची नांवे सदर दाव्यात समाविष्ट करून दावा दुरूस्त करण्याची परवानगी मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे मयत वादी यांचे वारस दाव्यात देणेची विनंती केली. याउलट प्र.वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले असुन वादींनी केलेली मागणी मुदतीत नाही. तसेच, सदर विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब, सदर अर्ज हा रूपये २०००/– खर्च प्रतिवादींना देण्यात येउन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०३. वादींची सदर अर्जातील विनंती, प्र.वादींनी सदर अर्जावर त्यांचा जबाब/लेखी म्हणणे याचा विचार केला. वादींनी सदर दाव्यातील मुळ मयत वादी चे वारस दाव्यात समाविष्ठ करण्यासाठी ९० दिवसांच्या आंत सदरचा अर्ज दाखल केला नाही. परंतु, सदर अर्जात जागतीक महामारीचे देण्यात आलेले कारण संयुक्तीक आहे. तसेच, वादीने मयत वादी क्र. १० सुंदराबाई उर्फ सरीबाई रामू गांगुर्डे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची छायांकीत प्रत अर्जासोबत दाखल केली आहे. यावरून मयत वादी क्र. १० ही दिनांक १३/११/२०१८ रोजी मयत पावली व वादीने सदरचा अर्ज दिनांक ०१/०१/२०२२ रोजी दाखल केला आहे. जागतीक महामारी ही मार्च २०२० मध्ये सुरू झाली. वादीने १३/११/२०१८ ते मार्च २०२० पावेतो सदरचा अर्ज का दाखल केला नाही याचे कारण नमुद केले नाही. प्रस्तुतचा दावा वादीने ठरावाचे मागणीचा, दावा वाटपाचे व कब्जा आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे मयत वादी यांचे वारस दाव्यात समाविष्ठ करणे गरजेचे आहे. असे जरी असले तरी, सदर अर्ज हा दाखल करण्यास विलंब झाला आहे. यास्तव, न्यायाच्या दृष्टीने वादींचा सदरचा अर्ज खर्चासहीत मंजुर करणे योग्य होईल. म्हणुन वरील बाबीचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

—:: **आदेश** ::—

०१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ वादींना आदेशीत करण्यांत येते की, सदर अर्जात मागणी केल्याप्रमाणे मयत वादी क्र. १० सुंदराबाई उर्फ सरीबाई रामू गांगुर्डे यांच्या वारसांची नांवे सदर दाव्यात समाविष्ट करून दाव्यात त्याप्रमाणे दुरूस्ती करावी.

३ वादींनी खर्च म्हणुन रक्कम रूपये ५००/— मेडिएशन सेंटरमध्ये जमा करावी व रूपये ५००/— प्रतिवादींना दयावे.

४ वादीने दुरूस्ती दाव्याची प्रत सदर दाव्यात दाखल करावी.

( डि.एम.गित्ते )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— १५/०३/२०२२.